# एम. एन. रॉय आणि कार्ल मार्क्स – एक अभ्यास

श्री. मानवेन्द्रनाथ रॉय यांचे स्थान आधुनिक भारतीय राजकीय विचारांच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण असे आहे कारण त्यांनी नवमानवतावाद या नव्या विचारसरणीची मांडणी केली. रॉय यांचा नवमानवतावादापर्यन्तचा प्रवास मार्क्सवादापासून सुरू झाला. भारतात मार्क्सवादी विचार रुजविण्यात रॉय यांचा मोठा वाटा होता. पण नंतरच्या काळात मार्क्सवादाच्या साह्याने भारताचे व जगाचे प्रश्न सोडविता येत नाहीत असे त्यांचे मत बनले. व्यक्तिस्वातंत्र्य व विवेकनिष्ठ नैतिकता यावर आधारलेला मानवतावादी समाज हे त्यांचे ध्येय होते. त्यादृष्टीने सुरुवातीस त्यांनी मार्क्सवादात काही सुधारणा सुचविल्या पण नंतर आपले स्वत:चे असे स्वतंत्र तत्त्वज्ञान प्रतिपादन केले.

श्री. रॉय यांच्या वैचारिक जीवनाचे मुख्यत: तीन टप्पे पडतात. सुरुवातीच्या काळात ते जहाल राष्ट्रवादी होते आणि बाप्पा जतीन यांच्या नेतृत्वाखालील गुप्त संघटनेचे ते सदस्य होते. [1] त्यामधूनच त्यांनी गदर पक्षाच्या सशस्त्र राजकीय चळवळीमध्ये भाग घेतला. मेक्सिकोत असताना ते समाजवादी विचारांकडे आकर्षिले गेले व त्यानंतर ते कडवे मार्क्सवादी बनले. येथे त्यांच्या वैचारिक जीवनाचा दुसरा टप्पा सुरू झाला. त्यानंतर ते जवळ जवळ बारा वर्षे मार्क्सवादी होते आणि लेनिन व स्त्यालिन यांच्या खांद्यास खांदा लावून त्यांनी आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत काम केले. कम्युनिस्ट इंटरनॅशनलशी त्यांचा बराच जवळचा सहभाग होता वासाहतिक देशातील क्रांतीच्या समस्यांबाबत त्यांचे आग्रही विचार त्या काळात अगत्याने ऐकले जात. पण १९३० नंतर ते कम्युनिस्ट चळवळीतून बाहेर पडले. भारतात आल्यावर त्यांना सहा वर्षे कारावासाची सजा झाली. १९३५–३६ नंतर रॉय यांच्या वैचारिक जीवनातील तिसरा टप्पा सुरू होतो. या काळात रॉय हे हळूहळू मार्क्सवादाच्या प्रभावक्षेत्रातून बाहेर पडले आणि कम्यु-

निझमच्या पलीकडे जाऊन त्यांनी प्रथम प्रागतिक लोकशाहीचे तत्त्वज्ञान मांडले. त्याचीच परिणती पुढे त्यांच्या नवमानवतावादात झाली. रॉय याचे विचार जरी फारसे लोकप्रिय झाले नाहीत तरी त्यांना बौद्धिकदृष्टया श्रेष्ठ दर्जाचा एक अनुयायीवर्ग लाभला. शिक्षणाच्या व बौद्धिक क्रांतीच्या द्वारे पक्षनिरपेक्ष कार्य करून प्रागतिक सामाजिक क्रांती घडवून आणणे हे या गटाचे उद्दिष्ट होते.

(१)

रॉय यांना आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीत नाव मिळाले ते त्यांनी लेनिनशी व्यक्त केलेल्या मतभेदामुळे. त्यांनी लेनिनशी मतभेद व्यक्त करून वासाहतिक क्रांतीच्या संदर्भात वेगळे विचार मांडले. या काळात लेनिनचे असे मत होते की वासाहतिक देशात चालू असलेल्या सर्व स्वातंत्र्यचळवळी मूलत: प्रगतिशील आहेत कारण त्या साम्राज्यविरोधी आहेत. पण रॉय यांचे असे मत होते की या चळवळी साम्राज्यवादविरोधी असल्या तरी त्या चळवळीच्या पुढाऱ्यांना सरंजामशाही आधार असल्यामुळे त्या तितक्या प्रगतशील नाहीत. त्यामुळे या चळवळी जर कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली चालविल्या गेल्या, तरच त्या खऱ्या अर्थाने प्रगतिशील होतील. [२] रॉय यांनी म. गांधींना जो आजन्म विरोध केला त्याची सुरुवात येथून होते. लेनिनला रॉय यांचे विचार जरी मान्य झाले नाहीत तरी त्याने रॉय यांना त्यांचे विचार मांडण्यास अनुमती दिली. यानंतरच्या काळात रॉय हे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीतील एक महत्त्वाचे पुढारी बनले आणि वासाहतिक देशात साम्यवादी पक्ष स्थापन करून तेथील साम्राज्यवादविरोधी चळवळी क्रांतिक्षम करण्याचे त्यांचे सतत प्रयत्न चालू होते. १९२८–२९ साली चीनच्या कम्युनिस्ट पक्षास मार्गदर्शन करण्यासाठी रॉय गेले पण क्रांतीचा प्रयत्न फसला आणि रॉय यांना हळुहळू कम्युनिस्ट इंटरनॅशनलमधून दूर करण्यात आले.

या काळात भारताच्या संदर्भात मार्क्सवादी विचारांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न रॉय यांनीच प्रथमत: केला. त्या दृष्टीने त्यांचे ' India in transition ' हे पुस्तक महत्त्वाचे आहे. भारतात भांडवलदार वर्ग आता महत्त्वाचा वर्ग बनला असून सरंजामशाहीचा पराभव झाला आहे असे विचार त्यांनी या पुस्तकात मांडले. भारतात भांडवलदार वर्ग हा मुख्य बनल्यामुळे (सरंजामशाहीच्या संदर्भात) तो आता क्रांतिकारक वर्ग राहिलेला नसून नव्याने जागृत होणारा कामगार वर्ग हाच खरा क्रांतिकारक वर्ग आहे व भांडवलशाहीच्या विरोधात कामगारवर्गाचे

राजकारण चालविण्याची गरज निर्माण झाली आहे. या पुस्तकाचे एक वैशिष्टच म्हणजे रॉय यांनी केलेली राष्ट्रीय चळवळीची मार्क्सवादी मीमांसा. रॉय म्हणतात की, राष्ट्रीय चळवळीचा विकास येथील भांडवलशाहीच्या विकासाबरोबर झाला. त्यातील नेमस्त राजकीय पुढारी जरी भांडवली विचारांचे पाठीराखे असले तरी त्यांच्यातील काहीजणांचे सामाजिक विचार बरेच प्रगतिशील होते. या उलट जहाल पुढारी जरी साम्राज्यवादाचे कडवे विरोधक असले तरी ते सतत इतिहासाकडे मागे वळून पाहात. त्यांचे सामाजिक विचार प्रतिगामी होते. या पुढाऱ्यांनी आपल्या देशात राजकीय पुनरुज्जीवनवादाची मुहूर्तमेढ रोवली. रॉय यांचे असे मत होते की गांधीवाद पण याच परंपरेचा वारसा पुढे चालवीत आहे कारण इच्छा नसताना त्यास प्रतिगाम्यांना मदत करावी लागत आहे. या गांधीवादाची त्यांनी क्षुद्र मध्यमवर्गीय मानवतावाद म्हणून संभावना केली. मानवी प्रगतीच्या प्रचंड घालमेलीमध्ये व निरनिराळ्या शक्तींतील घणघोर संघर्षामुळे गांधीवादी प्रचंड गोंधळात सापडले आहेत असे त्यांचे मत होते. [३] रॉय यांनी या पुस्तकात असे मत व्यक्त केले आहे की भारतातील राष्ट्रीय क्रांती सर्व श्रमिकांच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक क्रांतीशिवाय पूर्ण होणार नाही आणि अशा प्रकारची क्रांती कामगारच करू शकतो. [४]

मार्क्सवादी असतानाचे रॉय यांचे दोन विचार महत्त्वाचे आहेत. वासाहतिक क्रांतीबाबत रॉय यांनी मांडलेला विचार लक्षणीय होता याचे कारण हे की तिसऱ्या जगातील स्वातंत्र्यासाठी कार्यरत असणाऱ्या शक्तींची दुसरी बाजू त्यांनी बरोबर ओळखली. वासाहतिक समाजातील साम्राज्यवादविरोधी शक्ती कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली काम करीत असतील तरच त्या खऱ्या अर्थाने क्रांतिकारक समाज स्थापन करतील. पण त्या शक्ती जर नवजागृत व कमजोर भांडवलदारांच्या नेतृत्वाखाली काम करतील तर त्या वर्गातील बऱ्याच लोकद्रोही व प्रतिगामी शक्ती सत्तेवर येतील हे रॉय यांचे मत होते. एक सर्वसाधारण सिद्धांत म्हणून त्यांचे मत बरोबर होते. पण लेनिनच्या काळातील संदर्भ जर आपण तपासला तर रॉय यांच्या मताला त्या काळात फारसा व्यावहारिक अर्थ नव्हता. याचे कारण असे की वासाहतिक समाजात साम्राज्यवादविरोध मुख्यतः त्या देशातील नवजागृत भांडवलदार वर्गाकडूनच होत होता. तो वर्ग साम्राज्यवादविरोधी होता म्हणून प्रामुख्याने प्रगतिशील होता. त्यामध्ये प्रतिगामी राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या शक्ती असल्या तरी त्यांच्यामुळे साम्राज्यवादविरोधास तडा जात नव्हता. म्हणून वासाहतिक देशातील साम्राज्यवादविरोधी भांडवली शक्तींना पाठिंबा दिला पाहिजे, कारण कामगारवर्गाची

ताकद या देशात फार कमी आहे असे लेनिनचे मत होते. साम्राज्यवादविरोधी राष्ट्रवादातूनच कामगारवर्गाची प्रगतिशील चळवळ जन्म घेत असते. पण रॉय यांच्याजवळ ही द्वंद्वात्मक मीमांसेची दृष्टी नव्हती कारण त्यांचा ऐतिहासिक अनुभव मर्यादित होता.

रॉय यांच्या भारतीय परिस्थितीच्या मूल्यमापनात पण काही चुका झाल्या त्या त्यांनी नंतर कबूल पण केल्या.[५] त्यांनी त्या काळी असे मत व्यक्त केले की भारतातील मुख्य शत्रू सरंजामशाही नसल्यामुळे राष्ट्रीय भांडवलदारीस क्रांतिकारक शक्ती मानणे बरोबर नाही. रॉय यांनी भारतीय परिस्थितीचे जे चित्रण केले ते फारसे बरोबर नव्हते कारण ते सांगतात तेवढा भांडवली विकास देशात झालेला नव्हता. पण भारतातदेखील कामगारवर्ग क्रांतिक्षम झाला आहे या अभिनिवेशातून हे पुस्तक लिहिले गेले आहे. गांधीजींच्या नेतृत्वाखालची राष्ट्रीय चळवळ प्रतिगामी स्वरूपाची आहे असे त्यांनी सांगितले. भारतात रॉय सांगतात तेवढा कामगारवर्गाचा विकास झालेला नव्हता. त्यामुळे कामगारवर्गाच्या चळवळी राष्ट्रीय चळवळीचा एक भाग म्हणूनच साम्राज्य-शाहीविरोध अभिव्यक्त करू शकत होत्या हे वास्तव रॉय यांना समजले नाही. याचे कारण त्यांचा ऐतिहासिक दृष्टिकोन तर्ककठोर होता. त्यामुळे इति-हासाच्या विकासक्रमातील अंतर्विरोधग्रस्त द्वंद्वात्मकता त्यांना समजू शकली नाही. भारतीय राष्ट्रीय चळवळ व म. गांधी साम्राज्यवादविरोधी जी लोकशाही चळवळ करीत होते त्यांतील पुरोगामी बाजू त्यांनी लक्षात घेतल्या नाहीत. त्यामुळे म. गांधींच्या विचाराचे व कार्याचे यथायोग्य आकलन त्यांना करता आले नाही. संपूर्ण भारतीय संदर्भात गांधी व कॉंग्रेस यांच्या भूमिका व स्थान त्यांनी व कम्युनिस्ट पक्षाने नीट समजून न घेतल्यामुळे कम्युनिस्ट चळवळीचा मोठाच तोटा झाला.

भारतीय परिस्थितीचे मार्क्सवादी दृष्टिकोणातून विश्लेषण करण्याचे महत्त्वाचे कार्य रॉय यांनी केले. त्याचप्रमाणे भारतीय इतिहासाच्या संदर्भात इस्लामचा प्रगतिशील कार्यभाग स्पष्ट करून त्यांनी त्या काळात वैचारिक दृष्टचा प्रभावी असणाऱ्या जातीयवादी इतिहासकारांना समर्थ प्रत्युत्तर दिले. पण रॉय यानंतरच्या काळात हळूहळू मार्क्सवादी विचारांच्या पलीकडचा मार्ग शोधू लागले. त्यातूनच त्यांनी प्रथम प्रागतिक लोकशाहीचे, प्रागतिक मानवता-वादाचे किंवा नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान प्रतिपादन केले. मार्क्सच्या काही प्रमेयांत सुधारणा करीत करीत शेवटी रॉय पूर्णतः कम्युनिस्टविरोधी बनले.

## (२)

कारावासातून सुटका झाल्यानंतर रॉय कॉंग्रेस पक्षात सामील झाले. पं. नेहरू व कॉंग्रेसमधील डाव्या गटांशी जवळीक साधण्याचा या काळात त्यांनी प्रयत्न केला. रॉय यांना कॉंग्रेसचे संसदीय राजकारण मंजूर नव्हते. त्यांनी म गांधीच्या नेतृत्वाला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. रामगड अधिवेशनात कॉंग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढविली. यानंतर रॉय हळूहळू कॉंग्रेसच्या बाहेर पडण्याचा विचार करू लागले कारण गांधीप्रणीत राष्ट्रवादाची विचारसरणी सामाजिक प्रगतीस खीळ घालणारी आहे, त्यांनी राष्ट्रवादात अध्यात्म व धर्म यांचा समावेश केल्यामुळे त्याच्या मूलभूत इहवादी प्रेरणा नि:सत्व झाल्या आहेत असे रॉय यांचे म्हणणे होते. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून म. गांधींना पर्यायी नेतृत्व निर्माण केले पाहिजे हे रॉय यांचे मत बहुसंख्य कॉंग्रेसजनांना आवडलेले नव्हते.

या काळात युरोपात मोठ्या प्रमाणात फॅसिझमचा उदय झाला. जर्मनी व इटाली हे देश फॅसिझमच्या ताब्यात गेले. रॉय हे फॅसिझमचे मोठे विरोधक. फॅसिझम हा अतिरेकी राष्ट्रवाद व प्रतिगामी समाजशक्ती यांच्या पोटी जन्मास येतो असे त्यांचे मत होते. भारतातील अध्यात्मवादी विचार फॅसिझमला फार जवळ आहेत, त्यामुळे भारतात फॅसिझमचे बरेच पाठीराखे असणे संभाव्य आहे.[६] फॅसिझमला विरोध करण्याबाबतचे रॉय यांचे विचार फार आग्रही होते. म्हणून त्या काळात त्यांनी ब्रिटिशांना पूर्ण सहकार्य देऊ केले. कॉंग्रेसचे पुढारी स्वत:स फॅसिझमचे विरोधक समजत असूनही अप्रत्यक्षरीत्या ते त्यास पाठिंबा देत आहेत याची त्यांना मनस्वी चीड आली. कॉंग्रेस पुढारी खोट्या व आत्मघातकी राष्ट्रवादाच्या बुरख्याखाली फॅसिझमचा पुरस्कार करीत आहेत. भारतीय अध्यात्मवादाच्या आवरणाखाली विकसित होणारा गांधीवाद हा एक प्रकारचा फॅसिझमच आहे. असे त्यांचे मत होते.[७] संपूर्ण युद्धकाळात रॉय यांनी इंग्रजांच्या बाजूने आणि कॉंग्रेसच्या विरोधात भयंकर जहाल आणि टोकाचा प्रचार केला. डिसेंबर १९४० मध्ये त्यांनी रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाची स्थापना केली. ब्रिटिशांविरोधी पोरकट भावनांचा उपयोग कॉंग्रेसवाले स्वत:च्या स्वार्थासाठी करीत आहेत असे त्यांचे मत होते.

रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाने युद्ध दोस्त राष्ट्रे जिंकीत आहेत हे ध्यानात घेऊन युद्धोत्तर पुनर्निर्माणाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. त्यासाठी

त्यांनी लोकांसाठी लोकांची योजना (Peoples plan) तयार केली आणि उद्याच्या भारताच्या संविधानाचा घटनात्मक आराखडा प्रसिद्ध केला. या आराखड्यात त्यांनी लोकशाही प्रजासत्ताकाची कल्पना मांडली. याच काळात त्यांनी मार्क्सवादाचे उल्लंघन करून जागतिक समाजवादाचे तत्त्वज्ञान मांडले. त्यांनी असे मत व्यक्त केले की त्यांचा मानवतावाद हा क्रांतिकारी राष्ट्रवाद वा स्वतंत्र साम्यवाद नसून ते एक स्वतंत्र असे तत्त्वज्ञान आहे ! त्यांचा नवमानवतावाद व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेला होता. त्यांनी हे स्पस्ट केले की, व्यक्तीचे स्वातंत्र्य हे एक स्वयंभू मूल्य आहे म्हणून समाज, राष्ट्र व वर्ग वगैरेंच्या नावावर समष्टीच्या वेदीवर स्वातंत्र्याचे बलिदान केले जाऊ नये. रॉय यांचा मानवतावाद शास्त्रीय पायावर आधारलेला आहे असे त्यांचे मत होते. म्हणून राजकारण हा एक मानवी व्यवहार आहे व तो शास्त्रीय पद्धतीच्या तत्त्वज्ञानानेच मार्गदर्शिला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. काही नीतिमूल्ये शाश्वत असतात. या नैतिक मूल्यांच्या संदर्भातच मानवी विकासाचा आलेख आणि ध्येयदृष्टी आपणास समजून घ्यावी लागते. मार्क्सवाद व संसदीय लोकशाहीच्या मार्गाने मानवाच्या विकासाचे व मुक्तीचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेल्या नव्या सर्जनशील ध्येयदृष्टीची व जीवनमूल्यांची गरज त्यांनी प्रतिपादन केली.

(३)

रॉय यांचे नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान मार्क्सवादावर रॉय यांनी जी टीका केली त्यामधून हळूहळू विकसित झाले. कारण सुरुवातीस रॉय हे कट्टर मार्क्सवादी होते. पण नंतर त्यांना मार्क्सवाद आजच्या जगाच्या भीषण समस्या सोडविण्यास पुरेसा समर्थ वाटेनासा झाला. त्यांनी मार्क्सवादाचे टीकात्मक परीक्षण केले. मार्क्सवर टीका करीत असताना त्यांनी मार्क्सच्या जवळजवळ सर्व सिद्धांतांना गैरलागू ठरविले.

रॉय हे मार्क्सप्रमाणेच भौतिकवादी तत्त्वज्ञानावर विश्वास ठेवणारे होते. कारण जडवादच माणसास ईश्वर, परलोक व अंधश्रद्धा यापासून मुक्त करू शकतो; तो ऐहिक, ऐतिहासिक व विवेकनिष्ठ भूमिका स्वीकारण्यास भाग पाडतो. म्हणून तो स्वीकारार्ह आहे. पण मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद हा खऱ्या अर्थाने भौतिकवाद नाही कारण तो जुन्या शास्त्रीय संशोधनावर आधारलेला आहे. उदा. मार्क्स विचारांना स्वतंत्र स्थान देत नाही. पण विचारांचे

मानवी विकासात स्वतःचे असे स्वयंभू स्थान आहे.[८] इतिहासाचा विरोध-विकासवाद पण चूक गृहीतकृत्यावर आधारलेला आहे; तो जडवादाच्या दुलगतेवर आधारलेला आहे. कारण एकत्व (monism) हे जडवादाचे महत्त्वाचे वैशिष्टच आहे.[९]

मार्क्सचा भौतिकवाद पुरेसा भौतिकवाद नाही कारण तो हेगेलच्या प्रभावाखाली संशोधित झाल्यामुळे स्थलकालसापेक्ष झाला आहे. त्यामुळे मार्क्सने विचारांचे स्वतंत्र अस्तित्व अमान्य करून बिंबात्मक प्रमाणशास्त्राचा पुरस्कार केला. सभोवतालची परिस्थिती व पर्यावरण माणसाचे विचार व आचार यांना मर्यादित करते या मार्क्सच्या विचारात व्यक्तिस्वातंत्र्य, स्वतंत्र विचार आणि माणसाची सर्जनशील कृती यांना दुय्यम स्थान मिळाले. त्यातूनच मार्क्सने आर्थिक नियामकतेचा सिद्धांत मांडला. त्याच्या मतानुसार आर्थिक रचना समाजबदलाच्या क्रियेत मूलभूत भूमिका पार पाडते आणि विचारसरणी राज्ययंत्रणा, तत्त्वज्ञान, धर्म वगैरे बाबी त्यास साहृय करतात. पण आर्थिक बाबींनाच पूर्ण महत्त्व दिल्यामुळे मार्क्सने विचारांच्या स्वतंत्र अस्तित्वाकडे दुर्लक्ष केले. मानवाच्या निर्मितीच्या काळापासून विचार हे महत्त्वाचे कार्य करीत असतात. प्रत्येक सामाजिक व राजकीय चळवळ एखाद्या विचाराच्या मार्गदर्शनाखालीच वाटचाल करीत असते. मार्क्सने विचारांची स्वायत्तता लक्षात घेणे आवश्यक होते असे रॉय यांचे मत आहे.[१०]

मार्क्सची इतिहासमीमांसा पण पूर्ण सत्यावर आधारलेली नाही असे रॉय यांचे मत होते. कारण मार्क्स मानवी प्रगतीमध्ये वर्गसंघर्षास महत्त्वाचे स्थान देतो. समाजात जे वर्गविभाजन होते ते आर्थिक संबंधावर होते. पण आर्थिक-संबंध सर्व मानवी समाजाचे नियमन करू शकत नाहीत. त्यामुळे आपण पाहातो की समाजात जसा वर्गसंघर्ष आहे तसेच वर्गसाहचर्य पण आहे. मानवी प्रगती फक्त संघर्षातून होत नाही. खरा संघर्ष हा वर्गावर्गांत नसून तो लोकशाही–हुकुमशाही व्यक्ती–राष्ट्र यांच्यामध्ये आहे. कारण संपूर्ण स्वातंत्र्य संपादन करून आपल्या सुप्त सामर्थ्याचे आविष्करण करण्याची प्रत्येक माणसाची इच्छा असते. ती वर्गसहकार्याशिवाय शक्य होत नाही. आपला इतिहास हा जर केवळ वर्ग–संघर्षांचाच इतिहास असेल तर मग त्यातून आतापर्यन्तचा सामाजिक विकास कसा काय झाला? आता देखील भांडवलशाही व्यवस्था दोन परस्परविरोधी वर्गांत विभागली जात नाही यावरून मार्क्सचा वर्गसंघर्षाचा सिद्धांत भ्रामक आहे हेच सिद्ध होते.[११]

मार्क्सच्या वर्गलढ्याच्या सिद्धांताचा खरा आधार त्याचा वरकड मूल्याचा सिद्धांत आहे. समाजात वरकड मूल्य तयार होत असते आणि या वरकड मूल्यामुळेच आतापर्यंत मानवी प्रगती झाली आहे असे मार्क्स यांचे मत होते. म्हणून वरकड मूल्य निर्माण होऊ नये अशी 'आत्मघातकी' मागणी मार्क्स करीत नाही. पण सामाजिक वरकड मूल्यामुळे कामगारांचे शोषण होते असे मत तो मांडतो. समाजातील एकच वर्ग जर ते मूल्य बळकावीत असेल तर ते बरोबर नाही असे रॉय यांचेही मत आहे. परंतु मार्क्सप्रणीत समाजवादी राज्यातही हे वरकड मूल्य कामगारांच्या हातात असेल, जो एक नवा सत्ताधारी वर्ग आहे. वरकड–मूल्य–निर्मितीतून जर कामगारांचे शोषण होत असेल– तर रशियासारख्या देशात जेथे मोठ्या प्रमाणांत वरकड मूल्य पैदा केले जाते, तेथे कामगारवर्गाचे जास्त मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. म्हणून वरकड मूल्याचा प्रश्न ज्याप्रकारे मार्क्सने उपस्थित केला, तो त्याप्रकारे त्याने उपस्थित करावयास नको होता. [१२]

रॉय यांचे असे मत आहे की मार्क्सने मध्यम–वर्गाकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले. मध्यमवर्गास त्याने क्रांतिक्षम न लेखता त्याची क्रांतिविरोधकांत गणना केली. परवापर्यंतचा इतिहास आपणास असे दाखवून देतो की भांडवल व श्रम यांच्यामधील आंतरक्रियेमध्ये मध्यमवर्गाची वाढ मोठ्या प्रमाणात होते आहे. मध्यमवर्ग प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात असतो म्हणून समाजवाद ही मध्यमवर्गाचीच विचारसरणी आहे असे मानले जाते. परंतु मध्यमवर्ग हा बौद्धिक व आर्थिकदृष्ट्या थोडासा प्रस्थापित व्यवस्थेपासून दूर असल्यामुळे सध्याच्या परिस्थितीच्या पलीकडे पाहण्याची ध्येयदृष्टी त्यास आलेली असते. पण मार्क्सच्या परंपराजड व पोथीनिष्ठ अनुयायांनी मध्यमवर्गाचे हे सामर्थ्य न ओळखल्यामुळे क्रांतिकारक शक्ती शबल झाल्या. [१३] कामगारवर्ग हा क्रांतीच्या लढ्यातील अग्रेसर वर्ग आहे असे त्या वर्गाचे उदात्तीकरण केले गेले पण मध्यमवर्गाच्या पाठिंब्याशिवाय कामगारवर्ग क्रांती करू शकत नाही कारण तो सांस्कृतिक आणि बौद्धिकदृष्ट्या मागासलेला असतो. कामगारातील सुसंस्कृत आणि बुद्धिवादी वर्गास आपणाकडे आकर्षित करण्यास कम्युनिस्ट पक्ष अयशस्वी ठरला आहे याचे मूळ मार्क्सच्या मध्यम वर्गाविषयीच्या चूक विश्लेषणात सापडते असे रॉय म्हणतात. [१४]

रॉय यांना मार्क्सची राज्यक्रांतीची कल्पना पण मंजूर नाही कारण फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी ज्या प्रकारे लष्करी उठाव करून क्रांती करण्यात आली त्याप्रकारची क्रांती करणे आता शक्य नाही. कारण आता राज्यसंस्थेचे स्वरूप

बरेचसे बदलले आहे. राज्यसंस्था आता पूर्वीपेक्षा जास्त बळकट आणि मजबूत झाली असून आधुनिक शस्त्रे व युद्धविषयक व्यूहरचनांमुळे सशस्त्र उठावाच्या द्वारे सत्ता हस्तगत करणे अशक्यप्राय बनले आहे. म्हणून सशस्त्र क्रांतीऐवजी अहिंसक क्रांतीचा मार्ग जास्त श्रेयस्कर आहे. कारण प्रस्थापित समाजाची पुनर्रचना करणे ही काळाची गरज आहे. पण त्यासाठी सशस्त्र क्रांतीची गरज नसून सहमतीवर व संमतीवर आधारलेली लोकांची क्रांती झाली पाहिजे [१५] क्रांतीचे साध्यच शुद्ध असून चालत नसून साधने पण शुद्ध हवीत असे रॉय यांचे मत होते.

रॉय यांनी मार्क्सच्या राज्यविषयक सिद्धांतावर कठोर टीका केली आहे कारण मार्क्स म्हणतो तशी राज्यसंस्था ही समाजातील एका वर्गाच्या हातातील बाहुले नसून ती समाजाचे एक राजकीय संघटन आहे. समाजाच्या प्रगतीसाठी एक प्रकारचे राजकीय संघटन आवश्यक असते म्हणून साम्यवादी समाजात राज्य लय पावेल ही मार्क्सवादी कल्पना दिवास्वप्न आहे. राज्यसंस्था ही मुख्यतः समाजाच्या व्यवस्थापनाचे आणि संयोजनाचे कार्य करीत असते कारण ती समाजाने आपल्या विकासाच्या क्रमात निर्माण केलेली संस्था आहे. म्हणून जोपर्यंत सुसंस्कृत मानवी समाज आहे तोपर्यंत राज्यसंस्था नष्ट होणार नाही. [१६] राज्यसंस्था ज्याप्रमाणे नाश पावणार नाही त्याचप्रमाणे वर्गविहीन व राज्यविहीन समाज अस्तित्वात येणार नाही याचे कारण असे की मार्क्सची वैश्विक साम्यवादाची ध्येयदृष्टी इतिहासाच्या चूक विश्लेषणावर आधारलेली आहे. वर्गविहीन समाज त्यावेळी स्थापन होईल ज्यावेळी विरोधविकासाचे क्रम बंद पडतील. भांडवल व श्रम यांच्यातील अंतराय नष्ट होईल. पण तेथे इतिहासाचा अंत होईल. मानवी प्रगतीची वाटचाल थांबेल आणि संपूर्ण मानवजात विनाश पावेल. म्हणून मार्क्सचे साम्यवादी समाजाचे विचार मानवी इतिहासाच्या विकासाचे सर्व क्रम आकळू शकलेले नाहीत असे रॉय यांचे म्हणणे होते. [१७]

मार्क्सच्या मूलभूत मानवतावादी तात्त्विक भूमिकेशी त्यांचा विरोध नाही. पण मार्क्सवादाच्या नावाने जी कम्युनिस्ट पक्षाची सरकारे रशिया व चीनमध्ये स्थापन झाली त्यांचा त्यांनी कडकडून विरोध केला. मार्क्सच्या बहुतेक प्रमेयांचे खंडन करीत असताना त्यांनी रशियातील कम्युनिस्ट पक्षाच्या व्यवहाराचाच वेळोवेळी दाखला दिला. रशियात २० वर्षे कम्युनिस्ट सत्तेवर असूनसुद्धा तेथे राज्य नष्ट झाले नाही. विरून गेले नाही. उलट कम्युनिस्ट पक्षाच्या हातात

जास्तीत जास्त सत्ता केंद्रित झाली. कामगारवर्गाची हुकुमशाही ही अवस्था तात्पुरती न रहाता कायमची झाली आहे. तो एक स्वार्थ बनला आहे. राज्य–संस्था लय पावत नाही व कामगारवर्गाची हुकुमशाही कायम राहते अशी ही शृंगापत्ती आहे.[१८] रॉय यांचे असे मत होते की कम्युनिस्टांची लोकशाही ही खरी लोकशाही नाही कारण तेथे विविध पर्याय नाहीत.[१९] रॉय कम्युनिस्टांचे मोठे विरोधक बनले कारण कम्युनिस्ट नीतिशून्य राजकारण करतात आणि जीवनातील नीतीच्या महत्त्वपूर्ण स्थानाकडे त्यांचे दुर्लक्ष होते. त्यामुळे त्यांची भूमिका नेहमीच संधीसाधू स्वरूपाची असते. त्यांच्या स्थलकालसापेक्ष भूमिके-मुळे नैतिकता ही मानवी सदसद्विवेक बुद्धीच्या सहकार्याने विकसित होणारा एक ऐहिक व्यवहार असतो हे मत कम्युनिस्टांना मान्य नाही. रॉय यांनी सांस्कृतिक व सामाजिक परंपरांच्या सुधारणेस महत्त्वाचे स्थान देऊन सांगितले की भारतासारख्या देशात खरी सामाजिक क्रांती त्याशिवाय होणार नाही. आशियासारख्या मागास देशात कम्युनिझम व फॅसिझमसारखी समष्टिवादी तत्त्व-ज्ञाने फोफावतील याचे कारण त्या देशांना स्वातंत्र्याचे महत्त्व कळालेले नाही. आशियातील कम्युनिस्ट क्रांतीमुळे हिंसा, पाशवी क्रौर्य आणि द्वेष यांच्यात वाढ होऊन आशियाई झोटिंगशाही सुधारणावादाचे नावाने लोकांच्या मानगुटीवर बसेल कारण फॅसिझमच्या वाढीसाठी या देशातील सांस्कृतिक परंपरा पोषक आहेत असे रॉय यांचे मत होते.[२०] त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या दिवसात रॉय कम्युनिस्ट पक्षाचे मोठे विरोधक बनले होते. कम्युनिझम व संसदीय लोकशाही या दोन पर्यायांना मोडीत काढून माणसाच्या सर्वांगीण विकासा–साठी एका नव्या पर्यायाची मांडणी करण्याची आवश्यकता रॉय यांना भासत होती म्हणूनच त्यांनी प्रागतिक लोकशाहीचे व नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान लोकांसमोर मांडले. आता मार्क्सपेक्षा रॉय यांची ध्येयदृष्टी वेगळी होती.

(४)

रॉय यांनी आपले नवमानवतावादाचे तत्त्वज्ञान नव्या शास्त्रीय संशो–धनावर आधारित असल्याचे म्हटले आहे. पदार्थविज्ञान आणि जीवशास्त्रातील नव्या संशोधनाच्या आधारे त्यांनी त्यांचे मानवतावादी दर्शन विकसित केले. मानव हा आपल्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदु असून त्याच्या समस्यांभोवतीच आपले तत्त्वज्ञान विकसित केले असल्याचा दावा त्यांनी केला आहे. स्वातं-त्र्याची आस आणि सत्याचा शोध यासाठी मानव हजारो वर्षांपासून प्रयत्न करीत आहे कारण माणसाचा जीवनसंग्राम उद्देशपूर्ण असतो.

रॉय यांचा भौतिकवाद हा एक प्रकारचा अद्वैत–भौतिकवाद होता, तो विरोधविकासवादावर आधारलेला नव्हता. माणूस जन्मल्यापासून आपल्यास प्रतिकूल अशा पर्यावरणाशी आणि निसर्गाशी संघर्ष करीत आहे. हा संघर्ष माणूस स्वतःच्या अस्तित्वासाठी करीत असतो. हा लढा सोद्देशपूर्ण झाला की तो स्वातंत्र्याच्या शोधामध्ये परिवर्तित होतो आणि मग अस्तित्वाचा लढा हा स्वातंत्र्याचा लढा बनतो, तो जास्त आशयसंपन्न, व अर्थपूर्ण बनू लागतो. अस्तित्वासाठीचा संघर्ष हा स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष असतो. प्रत्येक मानवी व्यवहारात एक प्रकारचा उद्देश असतो. तो उद्देश सत्याचा शोध करणे हा असतो आणि शास्त्र सत्याच्या शोधार्थ प्रयत्नरत असते. म्हणूनच नवनव्या शास्त्रीय शोधांच्या साहृयाने माणूस निसर्गावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करतो. सत्य, ज्ञान व स्वातंत्र्य यांच्या साहृयाने मानवी अस्तित्वाचे रहस्य आपणास जाणता येते. त्याच्या साहृयानेच भौतिक, मानसिक व नैतिक समस्यांची सोडवणूक करता येते.[२१] रॉय यांचा भौतिकवाद व्यक्तीस दैव, नियती व ईश्वर यांच्या गुलामगिरीतून मुक्त करतो. माणसातील पुरुषार्थ जागा करतो.

रॉय जडवादी असले तरी विचारांचे महत्त्व त्यांनी मान्य केले आहे. मानसिक विश्व हे स्वायत्त असते आणि मानवी इतिहासास वळण लावण्यात विचारांचा कार्यभाग महत्वाचा असतो.[२२] काही नीतिमूल्ये शाश्वत असतात. ही शाश्वत मूल्ये माणसाच्या जैव अस्तित्व–संघर्षातून जन्म घेतात. त्यांचा उदय दैवी वा अधिभौतिक शक्तीतून होत नाही. तर तो आदिमानवीय जैव संग्रामांतून होतो. त्यामुळे रॉय यांनी सापेक्ष नैतिकतेस विरोध करून शाश्वत नीतिमूल्यांचा पुरस्कार केला.[२३] कारण रॉय यांच्या मते प्रत्येक माणूस विवेकी असतो, तो स्वतःच्या व्यक्तिमत्वामध्ये निहित विवेक आणि बुद्धिवाद याबाबत सजग असतो. त्याला सत्याचा शोध करायचा असतो, स्वातंत्र्याची आस लागलेली असते. त्यामुळे त्यास सामाजिक जबाबदारीची जाणीव असते. स्वातंत्र्याची उर्मी आपल्या इतकीच इतरांच्या ठायी पण वसत असते याची त्यास जाणीव असते. म्हणून विवेक व स्वातंत्र्य माणसाच्या मूळ प्रकृतीची वैशिष्ट्ये आहेत. आणि त्यांच्या प्राप्तीसाठीच माणूस इतिहास बनवितो, स्वातंत्र्याची क्षितिजे रुंद करण्याचा प्रयत्न करतो.[२४]

रॉय यांनी व्यक्तीला त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू मानून असे मत व्यक्त केले की व्यक्तिस्वातंत्र्य एकूण मानवी स्वातंत्र्याच्या सिद्धीसाठी आवश्यक आहे. समग्र मानवी स्वातंत्र्य हे व्यक्तीच्या पूर्ण स्वातंत्र्याचे मिळूनच बनलेले असते

साम्यवादी आणि फॅसिस्ट, वर्ग व राष्ट्र यांना व्यक्तीपेक्षा जास्त महत्त्वाचे ठर-वितात. दोन्हीही विचारप्रणाली व्यक्तीपेक्षा समष्टीस जास्त महत्त्व देतात. कम्युनिस्टांचा सामूहिक अहंभाव वर्गस्वरूपात व्यक्त होतो तर फॅसिस्टांचा सामूहिक अहंभाव राष्ट्रस्वरूपात व्यक्त होतो. या दोन्हीही विचारसरणी व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरोधी आहेत. [२५] म्हणून रॉय राष्ट्र वा वर्गावर विश्वास न ठेवता व्यक्तीस व तिच्या स्वातंत्र्यास जास्त महत्त्व देतात. रॉय यांचा मानवतावाद हा नवमानवतावाद आहे कारण तो नव्या वैज्ञानिक संशोधनाच्या प्रकाशात आणि ऐतिहासिक अनुभवाच्या साह्याने संपन्न केला गेलेला आहे. [२६]

मार्क्सवादाने प्रतिपादिलेली साम्यवादी राजवट कामगारवर्गाची हुकुमशाही म्हणून संघटित झाली आहे. या राजवटीत सत्ता काही लोकांच्या हातात केन्द्रित झालेली आहे. त्यामुळे तेथील व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात आलेले आहे. [२७] संसदीय लोकशाही भांडवलशाहीजन्य असमतेमुळे आणि राजकीय पक्ष व निवडणूक पद्धतीमुळे खऱ्या अर्थाने लोकशाही राहिलेली नाही. त्यामुळे रॉय यांनी प्रागतिक लोकशाहीचा पुरस्कार केला. या रॅडिकल डेमॉक्रसीत पाच वर्षांत एकदा मतदान करून मतदार गप्प बसणार नाही; तो सतत राज्ययंत्रणेच्या कारभारात हस्तक्षेप करून त्यास लोकानुवर्ती बनवील. त्यासाठी सत्तेच्या मोठ्या पुनर्वाटपाची आणि विकेंद्रीकरणाची गरज आहे. म्हणून त्यांनी गाव, शहर व इतर विभागास अनुलक्षून मोठ्या प्रमाणात सत्तेचे विकेन्द्रीकरण करणाऱ्या प्रागतिक लोकशाही राज्याची कल्पना मांडली. त्याप्रमाणे संसद ही एक सर्व लोकसमित्यांच्या कार्याचे संयोजन करणारी एकप्रकारची शिखरसंस्था असेल. [२८]

रॉय यांचे असे मत होते की रॅडिकल डेमॉक्रसी ही एक प्रकारची प्रत्यक्ष लोकशाहीची पद्धती आहे. आणि सत्तेचे विकेन्द्रीकरण लोकशाहीसाठी आवश्यक असते. म्हणून प्रत्यक्ष लोकशाहीचे जे विविध उपाय आणि मार्ग आहेत त्यांच्या साह्याने राज्यसंस्थेची अमर्याद सत्ता मर्यादित व नियंत्रित केली पाहिजे. कारण राजकीय सत्ता जरी समाजाच्या नियमनासाठी व व्यवस्थापनासाठी आवश्यक असली तरी ती जर एका व्यक्तीच्या हातात केन्द्रित झाली तर ती समाजासाठी धोकादायक बनते. मग शक्तिशाली राज्यांचे नागरिक स्वत: मात्र शक्तिहीन असतात. [२९] सत्तेच्या केन्द्रीकरणामुळे मानवी स्वातंत्र्य मर्यादित होत आहे त्यामुळे सत्ता व लोक यांच्यामध्ये एक प्रकारच्या दुव्याचे काम करणाऱ्या पक्षांच्या भूमिकेबाबत पण आपण पुनर्विचार केला पाहिजे असे रॉय यांचे मत होते. कारण ते सांगतात की राजकीय पक्षांच्या माध्यमातूनच समाजातील एक गट

सत्ता आपल्या हातात केन्द्रित करण्याचा प्रयत्न करतो. हा मोठा गट सत्तेचा दुरुपयोग करतो. म्हणून आपणास जर सत्तेचे विकेन्द्रीकरण करावयाचे असेल तर सत्तेच्या केन्द्रीकरणासाठी ज्या साधनाचा वापर केला जातो ते साधन नष्ट केले पाहिजे. राजकीय पक्षासारख्या साधनाऐवजी आपण अशा साधनांचा शोध घेतला पाहिजे की ज्यामुळे आम जनतेचे सर्वभौमत्व जनतेजवळच राहील. राजकीय पक्षामुळे सत्तेच्या राजकारणास जे महत्त्व प्राप्त झाले आहे ते कमी होईल. [३०] उद्याच्या आदर्श लोकतंत्रात्मक राज्याचे स्वप्न चितारतांना रॉय म्हणतात, ' काही दिवसानंतर अशी वेळ येणार आहे की सर्व सत्ता आपल्या हातात केन्द्रित करणारी राक्षसकाय राज्यसंस्था स्वतःला लोकशाहीवादी म्हणवून घेण्यास धजावणार नाही. त्याऐवजी ठिकठिकाणी निर्माण झालेल्या स्वायत्त स्थानिक गणराज्यांनी बनलेले एक नवे लोकशाही राज्य जन्म घेईल. या राज्यात प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात असेल. या स्थानिक प्रजासत्ताकांमुळे राज्यसंस्थेचे सर्वसाधारण स्वरूपच बदलून जाईल'.[३१]

रॉय यांचा आदर्श समाज हा फक्त व्यक्तीशी व तिच्या स्वातंत्र्याशी बांधील आहे. कारण राज्य, राष्ट्र आणि वर्ग यासारख्या सामूहिक अहंकार पोसणाऱ्या संस्थांच्या ते विरोधी होते. म्हणून स्वतंत्र व्यक्तीचा स्वतंत्र विश्व–समाज हे रॉय यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी आर्थिक पुनर्घटनेची मागणी केली आणि मुक्त आर्थिक स्वातंत्र्यास आणि कम्युनिस्ट पद्धतीच्या जाचक नियोजनाला विरोध केला. आर्थिक पुनर्घटनेचे मुख्य तत्त्व उपयोगितेसाठी उत्पादन व गरजेनुसार वितरण हे आहे. हे नियोजन व नियमन विविध लोकसमिती करतील. रॉय यांचे असे मत होते की विचारवंत सुसंस्कृत आणि प्रबुद्ध वर्गाच्या मदतीनेच समाजाचे पुनर्घटन शक्य आहे. यासाठी त्यांनी शिक्षणाला महत्त्व दिले कारण प्रथम आपला माणूस बदलला पाहिजे व एकदा माणूस बदलला की समाज बदलणे अवघड नसते. कारण माणूस हाच इतिहासाचा कर्ता व धर्ता आहे आणि त्याने ही सर्व निर्मिती एक व्यक्ती म्हणूनच केलेली आहे. तो जितका स्वतंत्र, स्वाधीन, स्वायत्त, प्रगल्भ व प्रगत होईल तितके आपले सुन्दर व आदर्श समाजाचे स्वप्न साकार करणे सोपे होईल. म्हणून नव्या प्रगतीस समाजाच्या निर्मितीसाठी जास्तीस जास्त विवेकी लोकांची गरज आहे. ज्यांना माणूस म्हणून स्वतःचे सामर्थ्य माहीत आहे आणि ज्यांना नवे विश्व निर्माण करायचे आहे आणि ज्यांना स्वतंत्र माणसांचे स्वतंत्र जग निर्माण करावयाचे आहे, त्यांच्या प्रयत्नातूनच खरी लोकशाही व्यवस्था व आदर्श प्रागतिक विश्व–समाज, जो वर्ग, राष्ट्र व राज्य यांच्या बंधनातून मुक्त आहे, निर्माण होईल असा रॉय यांचा उदंड आशावाद होता. [३२]

## (५)

रॉय यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरवात जरी मार्क्सवादी क्रांतिकारक म्हणून केली असली तरी शेवटी ते मार्क्सवादी राहिले नाहीत. उलट मार्क्सच्या विचारांना व्यवहारात आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या रशिया व चीनमधील प्रयोगांचे ते मोठे विरोधक होते. कारण १९४२–४३ नंतर मानवी स्वातंत्र्य हे त्यांच्या विचाराचे मुख्य सूत्र बनले. त्यासाठी वैचारिक क्रांती त्यांना जास्त महत्त्वाची वाटत होती. म्हणून आशिया व भारतातील क्रांती येथील सांस्कृतिक परंपरांना विरोधूनच होऊ शकेल, कारण या देशात खऱ्या अर्थाने प्रबोधन झालेले नाही असे रॉय यांचे मत होते. मार्क्सवादी फक्त आर्थिक बाबीवर भर देतात. त्यामुळे मागास देशातील कम्युनिझम फॅसिझमचीच एक आवृत्ती असते. कारण अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, खुळचट धर्मवेड व धर्मांधता एका रात्रीत नष्ट होत नाहीत. म्हणून रॉय हे आशियाई कम्युनिझमचे मोठे विरोधक होते. [३३] याचे कारण असे की नंतरच्या काळात क्रांतीच्या सांस्कृतिक आणि वैचारिक अंगाला जास्त महत्त्व देण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यामुळे मार्क्सवादात त्यांनी ज्या सुधारणा सुचविल्या त्या एवढ्या मूलगामी होत्या की त्यात मार्क्सवाद फारसा काही शिल्लक राहात नव्हता.

मार्क्सचा विरोधविकासवादाचा सिद्धांत अमान्य केल्यानंतर इतर मार्क्सवादी संकल्पना अमान्य करणे क्रमप्राप्तच असते. त्यामुळे त्यावर आधारलेली प्रमाणशास्त्रीय प्रमेये पण त्यांनी अमान्य केली. मार्क्सची वर्गसंघर्षाची संकल्पना किंवा विरोधविकासवादाची संकल्पना रॉय व मार्क्सचे इतर विरोधक मानतात त्यापेक्षा जास्त गुंतागुन्तीची आहे. वर्गांमध्ये संघर्ष होत असला तरी त्यात सतत आंतरक्रिया चालू असते आणि सामाजिक संबंधांमध्ये या आंतर–क्रियेचे स्थान महत्त्वाचे असते. कारण विरोधविकासात देखील विरोधी वर्गातील अनुकूल गुणांचा समावेश करूनच प्रगती होत असते. विविध वर्गातील आंतरक्रिया मान्य केल्याशिवाय राज्यसंस्थेची उत्पत्ती समजू शकत नाही. समाजात चाललेल्या प्रखर वर्गसंघर्षाची धार बोथट करण्यासाठीच राज्यसंस्थेचा उदय झाला असल्याचे एंजल्स सांगतो. उत्पादनसाधनांचा व उत्पादनशक्तीच्या आधारावरच समाजात आर्थिक, राजकीय व सामाजिक बदल होतात हे मार्क्सचे म्हणणे रॉय यांना मान्य नाही. या बदलात आर्थिक साधनांचे महत्त्व मान्य करूनही मार्क्स सतत सांगत राहिला आहे की आधारभूत रचनेप्रमाणेच वरवरची आधारित रचनादेखील ऐतिहासिक विकासक्रमात महत्त्वाची भूमिक

बजावत असते. मार्क्सच्या विवेचनातील हा महत्त्वाचा भाग काढून टाकला की खाली शून्य राहते हे जॉन प्लॅमेनाझने ओळखले होते. पण रॉय यांनी प्रस्थापित युरोपीय विचारवंतांच्या पूर्वग्रहांची री ओढून तेच तेच आक्षेप मार्क्सवादाविरुद्ध घेतलेले आपणास दिसून येतात.

प्रस्तुत लेखात रॉय यांच्या मार्क्सवादावरील आक्षेपांचे सविस्तर खंडन-मंडन करण्याचा विचार नाही कारण तो एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे. पण येथे दोन-तीन आक्षेपांची चर्चा करणे गैरलागू ठरणार नाही. यापूर्वी पाहिल्याप्रमाणे रॉय यांचा दृष्टिकोण तार्किक जास्त आणि द्वंद्वात्मक कमी असा होता. त्यामुळे त्यांना वरवर प्रतिगामी दिसणाऱ्या वस्तूंमागील क्रांतिकारक आशय कळू शकला नाही. त्यामुळेच त्यांना म. गांधींचे व्यक्तिमत्त्व समजू शकले नाही. रॉय यांच्या कितीतरी जास्त प्रभावीरीत्या गांधींनी भारतात लोकशाही क्रांती यशस्वी करून दाखविली. याचे कारण असे की रॉय यांना गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रगतिशील पैलू समजू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना कोणत्याही राष्ट्रवादी विचारात फॅसिझम दिसायला लागला. साम्राज्यवादाविरुद्ध व सरंजामशाहीविरुद्ध राष्ट्रवाद हे एक प्रगतिशील तत्त्व होते हे रॉय विसरले. भारतीय अध्यात्मवाद हा फॅसिझमच्या जवळपास आहे असे त्यांचे मत होते. पण इतिहासाच्या प्रवाहात चैतन्यवाद कधी कधी प्रगतिशील भूमिका बजावत असतो व जडवाद प्रस्थापित व्यवस्थेचा पुरस्कार करतो हे त्यांच्या लक्षात आले नाही. पण इतिहासाच्या विकासक्रमाचे द्वंद्वात्मक स्वरूप लक्षात न घेतल्यामुळे एका विशिष्ट काळातील आंतर्विरोध व त्यानंतरच्या टप्प्यातील अंतर्विरोध यांच्यातील एकूण स्वरूपाबाबत त्यांनी गल्लत केली व इतिहासाचे विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट व निश्चित असे विश्लेषण न करता त्यांनी तार्किक सिद्धांत मांडले. रॉय यांनी आपले तत्त्वज्ञान नवीन तंत्रशास्त्रीय संशोधनावर उभे असल्याचे सांगितले. आजकाल तसा दावा जरी सर्वचजण करीत असले तरी एखादे शास्त्रीय संशोधन हे अंतिम सत्य नव्हे. तत्त्वज्ञान हे एक सामाजिक शास्त्र आहे जे मानवी व्यवहारांचा तात्त्विक दृष्टीने अभ्यास करते. तत्त्वज्ञानाला एक स्वतःचा स्वायत्त दर्जा असतो, ते तथाकथित शास्त्रीय शोधाच्या वर्चस्वाखाली वागू शकत नाही. मार्क्सचे तत्त्वज्ञान व त्याचा विरोधविकासवाद त्या अर्थाने तत्त्वज्ञान होते.

राज्यसंस्थेच्या विलयाबाबतचे व अंतिम साम्यवादी समाजस्थापनेबाबतचे मार्क्सचे विचार केवळ मनोराज्य होत असे रॉय यांचे मत होते-

कारण रशियात राज्यसंस्था नष्ट झालेली नाही. राज्यसंस्थेचा विलय झाल्या-नंतर समाजात व्यवस्थापन व संयोजन करणारी संघटना राहणार नाही, विरोधविकास साम्यवादी – समाजनिर्मितीनंतर थंडावेल व मानवजातीचा विनाश होईल ही रॉय यांची मते नवी नाहीत. राज्यसंस्था त्यावेळी लयास पावेल असे मार्क्सने म्हटले आहे, जेव्हा वैश्विक साम्यवादी समाज विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे प्रस्थापित होईल. रशियातील समाज हा संक्रमण काळा-तील समाज आहे. राज्याचे दंडसत्तात्मक स्वरूप नष्ट झाल्यानंतर व्यवस्थापन व संयोजनाचे काम लोकसमिती करतील असे मार्क्सने सांगितले आहे. विरोध-विकासाचे क्रम साम्यवादी समाजानंतर बंद होतील असे मार्क्स व एंजल्सने म्हटलेले नाही. साम्यवादी समाजानंतर कशाप्रकारचे अंर्तविरोध निर्माण होतील हे आपणास सध्या समजणार नाही. ज्याप्रमाणे सरंजामशाहीत वाढलेल्या रामदासाला लोकशाही समाजवादाचे चित्र रंगविणे अवघड होते त्याचप्रमाणे साम्यवादी समाजानंतरचे मानवी विकासाचे स्वरूप आपणास समजणे अवघड आहे. मनोराज्य तर मार्क्सप्रमाणेच रॉय यांनी पण उभे केले पण या सर्व मनोराज्यात मार्क्सचे मनोराज्यच तात्त्विकदृष्टया जास्त स्वीकारार्ह वाटलेले आहे.

रॉय यांनी त्यांच्या विवेचनात साम्राज्यवादाची युद्धोत्तर भूमिका लक्षात घेतली नाही कारण साम्राज्यवाद राजकीय वर्चस्वाबरोबरच संपला असे त्यांना वाटले. शोषणाचे मार्ग बदलले व देशा–देशातील विषम संपत्तीवाटपामुळे आणि विकासामुळे श्रीमंत देश गरीब देशांना गरीब ठेवत आहेत हे त्यांनी ध्यानात घेतले नाही. साम्राज्यवादापेक्षा त्यांचे हस्तक बनून जनतेवर जुलूम करणारे राज्यकर्ते त्यांना जनतेचे खरे दुष्मन वाटले. शेवटीशेवटी तर त्यांनी मागास देशातील सांस्कृतिक परंपरांना त्याबाबत दोषी धरले. उत्तर गोलार्धातील श्रीमंत राष्ट्रे दक्षिण गोलार्धातील गरीब व मागास राष्ट्रांवर अन्याय करीत आहेत. त्यांच्या नैसर्गिक संपत्तीची लुटालूट स्वतःच्या विकासासाठी व चैनी–साठी करीत आहेत. पण साम्राज्यवादाचे हे नवे रूप व त्यातून निर्माण झालेले प्रश्न रॉय यांनी लक्षात घेतले नाहीत.

व्यक्तीचे स्वातंत्र्य हे एक स्वयंभू मूल्य मानून रॉय यांनी आपली विचारसंपदा निर्माण केली. पण व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य सापेक्ष असते. अराजक आणि गृहयुद्धाच्या काळात व्यक्तिस्वातंत्र्याला काहीच अर्थ नसतो. शिवाय सत्तेचे विकेन्द्रीकरण झाले म्हणजे त्यातील जुलूम व अन्याय संपला

असे मानणे एक भ्रम आहे. कारण जातपंचायतीसारखी विकेन्द्रित संस्था किती जुलमी होती हे आपणास माहीत आहे. एखादा गाव–सरपंच पण गावातील लोकांवर मोठ्या प्रमाणात जुलूम करू शकतो. पण रॉय यांनी व्यक्तिस्वातंत्र्य व विकेन्द्रीकरण या दोन बाबी महत्त्वाच्या मानल्या पण त्यांचा ऐतिहासिक संदर्भ त्यांनी लक्षात घेतला नाही.

रॉय यांनी त्यांच्या विचारात काही महत्त्वाच्या बाबींवर विचार व्यक्त केले. त्यामध्ये मागास देशातील राजकीय क्रांतीबरोबरच तेथील सांस्कृतिक परंपरा त्यागणारी सामाजिक क्रांती आवश्यक आहे हे त्यांचे मत महत्त्वाचे होते. कारण या परंपराच फॅसीझमला पुढील काळात खरा आधार देतात हे त्यांचे निदानही भारताच्या बाबतीत बऱ्याच अंशी खरे आहे आणि तेच रॉय यांचे भारतीय विचारास खरे योगदान आहे.

राज्यशास्त्र विभाग अशोक चौसाळकर
शिवाजी विद्यापीठ

## संदर्भ

1. Karnik V. B. ; M. N. Roy— a political biography, Nav Jagriti Samaj, Bombay 1978. pp. 9-10.
2. Ibid pp. 107—114.
3. Ibid pp. 152—55.
4. Ibid pp. 155—56.
5. Ibid pp. 151—52
6. Ibid pp. 456—57.
7. Ibid pp. 496—97.
8. Roy M. N.; New Orietation p. 78.
9. Roy M. N.; Beyond Communism pp. 41—42.
10. „ New Orientation pp. 78—79.
11. „ New Humanism, A manifesto pp. 26—27.
12. Ibid pp. 24—26.

13. Ibid pp. 28—29.
14. Ibid pp. 30—31.
15. Roy M. N.; New Orientation pp. 36—38.
16. Ibid pp. 91—92.
17. Roy M. N.; Beyond Communism p, 42.
18. „ New Orientation pp. 90—95.
19. Ibid p. 101.
20. Karnik V. B.; Ibid pp. 190—121.
21. Roy M. N.; Beyond Communism pp. 29—31.
22. Ibid pp. 40—41.
23. Ibid pp. 48.
24. Karnik V. B.; Ibid pp. 608—609.
25. Roy M. N.; New Orientation pp. 94—95.
26. „ New Humanism pp. 36—37.
27. „ New Humanism p. 109.
28. „ Beyond Marxism p. 112.
29. „ Politics, Power and Parties pp. 37-38, 72-73.
30. Ibid pp. 76—78.
31. Ibid p. 128.
32. Roy M. N.; New Humanism pp. 49—50.
33. Karnik V. B. Ibid pp. 591—593.